# महानगरपालिने करावयाची विकासकामे

**२३ डिसेम्बर २०१०**

प्रज्ञा शिदोरे

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.
contactus.greenearth@gmail.com

(शासनव्यवस्थेच्या नीलप्रतीसाठी)

# महानगरपालिने करावयाची विकासकामे

*विकासकामांमध्ये महानगरपालिकेने करावयाची कामे कोणती? राज्य व केंद्राने करावयाची कोणती? यासंबंधी कायद्यात काय तरतूद आहे?*

*मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधे दिल्या गेलेल्या विकासकामांसाठी केल्या गेलेल्या तरतुदी प्रकरण व कलमानुसार देत आहे.*

***प्रकरण १२ नाल्या व जलनि:सारण***

**कलम १५३ ते कलम १८८ मधे आयुक्ताला नाल्या बंधणे त्या सुस्थितीत ठेवणे, सांडपाण्याची विल्हेवाट लावणे, नाल्यांमध्ये फेरफार करणे, साफ करणे इत्यादी कामे महानगरपालिका आयुक्ताची आहेत.**

***शौचालये (पान क्र. २०२)***

**क.१७९ अन्वये जरा एखाद्या इमारतीतत (**Commercial Non Commercial**) जर शौचालयांची सोय नसेल तर ते बांधकाम आयुक्तास अवैध ठरविता येईल.**

**क.१८० मुताऱ्या, संडास बांधणे व स्वच्छ ठेवणे**

***प्रकरण १३ पाणीपुरवठा***

नगरपालिका जलव्यवस्था बांधणे व ती सुस्थितीत ठेवणे

**क.१८९ ते क.२०१ मधे पाणीपुरवठ्याविषयी कलमे दिली आहेत.**

**क.१९० अन्वये राज्य शासनाने नेमलेल्या व्यक्तिंनी नगरपालिका जलव्यवस्था केंद्राची पाहणी करणे आवश्यक आहे.**

***प्रकरण १४ रस्ते***

कलम २०३ ते कलम २५२ पर्यंत आयुक्ताने करावयाच्या सार्वजनिक व खासगी रस्त्यांसंबंधींच्या तरतुदी दिल्या गेल्या आहेत. हयामध्ये आयुक्तास महानगरपालिकेकडून जेंव्हा प्राधिकृत होईल तेंव्हाचं (जेव्हा मनपा कडून त्याला अधिकआर मिळतील तेंव्हा) पुढील गोष्टी करता येतील.

क. २०५

(अ) नविन सार्वजनिक रस्ते आखणे व तयार करणे.

(ब) महानगरपालिकेच्या हद्दीत असलेला कोणताही भाग फिरवणे अथवा वळवणे.

(क) पूल व भूयारी मार्ग बांधणे

ह्या व्यतिरिक्त आयुक्तास खालील गोष्टींची काळजी घ्यायची असते.

१.उत्सवप्रसंगी तात्पुरते मांडव उभारण्यास परवानगी देणे.

२.रस्ते व रस्त्याजवळ कामे करण्यासंदर्भातील तरतुदी.

३.वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे यांसाठी करावयाच्या तरतूदी.

४.आकाशचिन्हे व जाहिराती.

५. रस्त्यावर दिवाबत्ती करणे.

*प्रकरण १८: स्वच्छताविषयक तरतुदी (क.२९० ते क.३२६)*

*१. झाडलोट आणि साफसफाई करणे व त्यासाठी लागणाऱ्या कचरा पेट्या, डबे व जागा यांची तरतूद करणे व त्या नेमून देणे.*

*२. जागांची पहाणी व स्वच्छतेविषयक विनियमन (व ज्या जागांवर स्वच्छतेच्या नसल्यास त्या जागा पडून टाकण्याचे पूर्ण अधिकार.*

*क.३०८ अन्वये स्वच्छताविषयक सोयी नसलेल्या झोपड्या वा छप्परे नोटीस लावून मग काढून टाकण्यविषयक सोयी.*

*प्रकरण १९ बाजार व कत्तलखाने यांचे परीक्षण व नियमन*

*ह्या अंतर्गत नविन बाजार इत्यादींसाठी तरतुदी करण्याचे अधिकार दिले गेले आहेत व त्याच वारोबर इतर विक्रीच्या जागांचे निरीक्षण व नियमांन करावयाचे आहे.*

*प्रकरण २० परिवहन उपक्रम: उपक्रम चालवणे आणि बांधकामे करणे व त्यांची देखभाल करणे*

*विविध परिवहन सेवांवर भाडे व आकार वसूल करणे*

*प्रकरण २१*

**जीवनविषयक आकडेवारी ह्या अंतर्गत जन्म-मृत्यूच्या नोंदि ठेवण्यात येतात.**